# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:16.01.2025** **वार:गुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सिंगापूरचे अध्यक्ष थरमन षण्मुगरत्नम यांची नवी दिल्लीत भेट घेणार.
2. निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचं पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रार्पण
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज देशातल्या सात विमानतळांवरच्या जलदगती इमिग्रेशन म्हणजे देशप्रवेश प्रवासी विश्वास यंत्रणेचं उद्घाटन करणार
4. इस्राईल आणि हमास यांची युद्धबंदीसाठी सहमती आणि
5. खोखो विश्वकरंडक स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या आणि महिलांच्या संघांचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<u>सिंगापूरचे राष्ट्रपती</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सिंगापूरचे अध्यक्ष थरमन षण्मुगरत्नम यांची नवी दिल्लीत भेट घेतील. षण्मुगरत्नम राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याशी चर्चा करतील. राष्ट्रपती मुर्मू त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी देखील देतील. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्लीत सिंगापूरच्या अध्यक्षांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी सेमीकंडक्टर, औद्योगिक उद्याने, कौशल्य विकास, डिजिटलायझेशन आणि व्यापार विकास या क्षेत्रातील सहकार्यावर चर्चा केली. डॉ. जयशंकर यांनी समाज माध्यमांवरील एका संदेशात सांगितलं की, दोन्ही देश द्विपक्षीय संबंधांची 60 वर्षे साजरी करत असताना, सिंगापूरच्या अध्यक्षांच्या भेटीमुळे भारत-सिंगापूर व्यापक धोरणात्मक भागीदारीला नवी गती मिळेल असा विश्वास आहे. अध्यक्ष थरमन पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. त्यांच्यासोबत मंत्री, संसद सदस्य आणि अधिकाऱ्यांसह उच्चस्तरीय शिष्टमंडळ आहे. सिंगापूरचे अध्यक्ष म्हणून त्यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. अध्यक्ष थरमन शुक्रवार आणि शनिवारी ओडिशालाही भेट देतील. भारत आणि सिंगापूरमध्ये मैत्री, विश्वास आणि परस्पर आदराच्या दीर्घ परंपरेवर आधारित व्यापक सहकार्य आहे. थरमन यांच्या भेटीमुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांना आणखी गती मिळेल अशी अपेक्षा आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचं राष्ट्रार्पण ही नौदलाच्या गौरवशाली परंपरेला भविष्यातील आकांक्षेशी जोडणारी ऐतिहासिक घटना आहे. यामुळे भारताची वाटचाल मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेनं सुरू असून भारताच्या सुरक्षा आणि प्रगतीला मोठं सामर्थ्य प्राप्त झाल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. सूरत आणि निलगिरी या युद्धनौका तसंच वाघशीर ही पाणबुडी; या तीन महत्वाच्या नौकांची बांधणी मुंबईतील नौदलाच्या माझगाव गोदीमध्ये करण्यात आली आहे. नेव्हल डॉकयार्ड इथे काल झालेल्या कार्यक्रमात मोदी यांच्या हस्ते राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नौसेना प्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. संपूर्ण विश्व हा परिवार समजून भारत विकासाच्या भावनेनं काम करतोय. तीन आघाडीच्या लढाऊ जहाजांचा

नौदलामध्ये समावेश म्हणजे भारताची एक भक्कम आणि स्वावलंबी संरक्षण दल निर्माण करण्याची दृढ वचनबद्धताच आहे. विकसनशील देशांमध्ये भारत एक विश्वासार्ह आणि जबाबदार देश म्हणून ओळखला जातो. तीन युद्धनौकांचं राष्ट्रार्पण हे आर्थिक दृष्टीनेही महत्त्वाचं असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

**<u>अमित शहा इमिग्रेशन</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबई, चेन्नई, कोलकता, बंगळूर, हैदराबाद, कोचिन आणि अहमदाबाद विमानतळांवर जलदगती इमिग्रेशन म्हणजे देशप्रवेश प्रवासी विश्वास यंत्रणेचं उद्घाटन करणार आहेत. या यंत्रणेमुळे प्रवाशांना जागतिक दर्जाच्या इमिग्रेशन सुविधा मिळणार आहेत, त्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवास सहज आणि विनाअडथळा होण्यासाठी मदत होणार आहे. या यंत्रणेनुसार प्रवाशांना ftittp.mha.gov.in या संकेतस्थळावर त्यांचे तपशील भरावे लागतील आणि योग्य कागदपत्रं अपलोड करावे लागतील. नोंदणीकृत प्रवाशांचे बायोमेट्रिक तपशील परदेशी विभागीय नोंदणी कार्यालयांमध्ये किंवा परदेशांमधल्या विमानतळांवर नोंदवले जातील. या प्रवाशांनी त्यांचे बोर्डिंग पास आणि पासपोर्ट विमानतळांवर स्कॅन केल्यानंतर प्रवाशांच्या बायोमेट्रिक तपशीलांची वैधता तपासून बघितली जाईल आणि ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्यानंतर ई-गेट आपोआप उघडली जातील आणि त्यांचे इमिग्रेशन झाल्याचे सूचित केले जाईल. या प्रणालीची अंमलबजावणी देशातील 21 विमानतळांवर केली जाणार आहे.

**<u>पंतप्रधान आकाशवाणी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी 19 जानेवारी रोजी आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमात देश-विदेशातील लोकांसोबत आपले विचार मांडतील. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा 118 वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या संपूर्ण नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजएअर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. आकाशवाणी न्यूज, दूरदर्शन न्यूज, पंतप्रधान कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवर देखील त्याचं थेट प्रसारण केलं जाईल. हिंदी प्रसारणानंतर प्रादेशिक भाषांमध्ये त्याचं लगेच प्रसारण केलं जाईल.

**<u>राजनाथसिंह</u>**

भारत संरक्षण क्षेत्रातील शस्त्र सामग्री आणि उपक्रमांसाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून राहू शकत नाही. देश संरक्षण सामग्रीबाबत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहे. 2025 हे वर्ष भारतीय सेनेचं तंत्रज्ञान सुधारणा वर्ष म्हणून जाहीर करण्यात आलं असून, या वर्षभरात तंत्रज्ञानविषयक सुधारणा केल्या जातील असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल पुण्यात केलं. 77 व्या लष्कर दिनानिमित्त आयोजित गौरव गाथा या कार्यक्रमात सिंह बोलत होते. यावेळी सिंह यांच्या हस्ते ऑलिम्पिक उत्कृष्टता केंद्राचा शिलान्यास आणि भारतीय रणभूमी दर्शन या संकेत स्थळाचं अनावरण करण्यात आलं. भारतानं नेहमीच युध्दाऐवजी बुध्दांना प्राधान्य दिलं आहे. मात्र, शांतता ही भारताची दुर्बलता नव्हे. जेव्हा आपण बळकट असू तेव्हाच शांतता शक्य असल्याचं संरक्षणमंत्र्यांनी सांगितलं.

**<u>संचलन</u>**

77 व्या लष्कर दिनाचं मुख्य संचलन काल पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या उपस्थितीत झालं. देशाची उत्तर सीमेवरील परिस्थिती स्थिर परंतु संवेदनशील आहे.

गलवान सीमेवरील घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी भारतीय सेना सतर्क आहे असं जनरल द्विवेदी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

## इस्राईल युद्धबंदी

इस्राईल आणि हमास यांनी युद्धबंदीलाछी सहमती दर्शवली आहे. कतारचे पंतप्रधान मोहंमद बिन अब्दुलरेहमान अल-थानी यांच्याबरोबर बैठकांनंतर या कराराचं स्वरूप निश्चित करण्यात आलं. या कराराची अंमलबजावणी रविवारी सुरू होणार असून, तो 42 दिवस अंमलात असेल. अल थानी यांनी काल दोहामध्ये या कराराबाबत माहिती दिली. या करारामुळे इस्राईलच्या ओलिसांची मुक्तता केली जाईल आणि गाझामध्ये मानवी मदतीला चालना मिळेल. इस्राईलमधल्या माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, आज त्या देशाच्या मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठक होऊन या कराराला मान्यता दिली जाईल. हमासनं दोहामध्ये मध्यस्थांबरोबरच्या चर्चेत कराराच्या मसुद्याला मान्यता दिल्याचं त्या संघटनेकडून सांगण्यात आलं. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन यांनी या कराराला दुजोरा दिला. पहिल्या टप्प्यात अमेरिकी ओलिसांची मुक्तता केली जाईल, असं ते म्हणाले. नियोजित अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी हा करार ऐतिहासिक असल्याचं म्हटलं आहे आणि आपल्या ऐतिहासिक विजयामुळे हा करार प्रत्यक्षात आल्याचं नमूद केलं आहे.

## अमेरिका निर्बंध

अमेरिकेनं भारताच्या भाभा अणुसंशोधन केंद्र, भारतीय दुर्मीळ पृथ्वीविज्ञान केंद्र आणि इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र या तीन संस्थांवरचे निर्बंध उठवले आहेत. अमेरिकेच्या उद्योग आणि सुरक्षा विभागानं ही घोषणा केली. शीतयुद्धाच्या काळात लादण्यात आलेले हे निर्बंध अमेरिकेच्या परदेशी धोरण उद्दिष्टांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीनं हटवण्यात आल्याचं या विभागानं म्हटलं आहे. हे निर्बंध उठवल्यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातल्या विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक संयुक्त प्रयत्नांना बळ मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, या निर्बंधांच्या यादीत 11 चिनी कंपन्यांचा समावेश करण्यात आला आहे.

## खोखो विश्वकरंडक

खोखो विश्वकरंडक स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या आणि महिलांच्या संघांनी उत्तम कामगिरी करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला आहे. नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या संघानं पेरुच्या संघावर 70-38 अशी मात केली. आदित्य गणपुले, सिवा रेड्डी आणि सचिन भार्गव यांनी चांगली कामगिरी केली. अनिकेत पोटेला सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर रामजी कश्यपला सर्वोत्कृष्ट आक्रमणाचा पुरस्कार मिळाला. महिलांच्या संघानं इराणवर 100-16 अशी मात केली. प्रियांका इंगळेला सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार मिळाला, तर मीनूला सर्वोत्कृष्ट आक्रमणाचा पुरस्कार मिळाला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**